महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २००२

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे

**विषय : सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन खालील शैक्षणिक संस्थेला तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००२ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, शिवनगर, ता.बारामती, जि.पुणे | माळेगांव (बु.), ता.बारामती, जि.पुणे |

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूदयाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळांना शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळांना परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची काग्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

विचाचेवरकर
( वि.व.चिंदरकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
३) मा. शालेय शिक्षण मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
४) मा. शालेय शिक्षण मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित

9 (12)

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक इमाशा २०१०/०१/१०/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक ११ मार्च २०१०

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते १२ वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.३०.३.२०१०.
२) संस्थेचा दि. ११.३.२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शिवनगर विद्याप्रसारक मंडळ, बारामती, या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या माळेगाव(बु)येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ.१२ वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १२ वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) सदर संस्थेने प्राथमिक शाळेतील सेवक संचमान्यता व कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता शैक्षणिक वर्ष सन २०१०-११ मध्ये घेणे अनिवार्य राहील.

(signature)

(डॉ. सुवर्णा सि.खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे. / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे
सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ,(माळेगाव बु.) ता.बारामती, जि.पुणे. / निवड नस्ती, माशि-१.

E:\rekha\note\ENG NEW SHIVNGAR- BARAMTI- 11310 2

(signature)
SECRETARY
Shivnagar Vidya Prasarak Mandal
Malegaon (BK.) Tal- Baramati Dist-Pune